फॉरेस्ट डेव्हलपमेट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, नागपूर
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
CIN:- U४५२००MH१९७४SGC०१७२०६
कार्यालय:- एफडीसीएम भवन, अंबाझरी, हिंगणा रोड, नागपूर-४४००३६
E-Mail : gmplnfdcm@gmail.com website = www.fdcm.nic.in

क्र.कक्ष-नियो/संववि/लिलाव/प्र.क्र.६३/२२-२३/ 604 नागपूर, दिनांक 13 JUN 2023

**ज्ञापन**

विषय : महाराष्ट्र वनविकास महामंडळातील ई-लिलाव कार्यप्रणाली संबंधीत.

महाराष्ट्र वनविकास महामंडळाच्या अधिपत्याखालील सर्व विक्री आगारातील वनोपजाची विक्री एनआयसी मार्फत विकसित केलेल्या पोर्टलच्या माध्यमातून ई-लिलाव प्रणालीद्वारे होत आहे.

२.० सदर ई-लिलाव प्रणालीची कार्यविधी पार पाडतांना बहुतांश वेळेस संबंधीत खरेदीदारांद्वारे विकत घेण्यात आलेल्या वनोपजाचे विक्री किंमतीच्या अनुषंगाने इएमडी, $1/4^{th}$ , $3/4^{th}$ इत्यादीची रक्कम त्यासाठी विहित केलेल्या मुदतीत भरावयाच्या अनुषंगाने ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करण्यात येते. परंतु काही वेळेस सदर रक्कम ई-लिलाव प्रणालीकरिता तयार करण्यात आलेल्या पुलींग अकाऊंट मध्ये विहित कालमर्यादेत Success / Reflect होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, विहित वेळमर्यादेपूर्वी online माध्यमाने भरणा करण्यासाठी खरेदीदाराने कार्यवाही सुरु करुनही, त्यांचेवर अनावश्यक भूर्दंड आकारण्यात येत असल्याबाबतचे निवेदन प्राप्त होत आहेत.

३.० यासंबंधी दिनांक ०६.०६.२०२३ रोजी NIC Team शी सखोल विचारविमर्श करुन खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

**३.१ "ई-लिलाव कार्यविधी दरम्यान संबंधीत खरेदीदारांद्वारे लिलाव प्रक्रियेमध्ये खरेदी करण्यात आलेल्या वनोपजाच्या विक्री किंमतीच्या अनुषंगाने देय असलेली रक्कम म्हणजेच EMD, $1/4^{th}$ , $3/4^{th}$ इत्यादीचा भरणा करण्याची कार्यवाही (Initiation) विहित कालमर्यादेपूर्वीच सुरु करण्यात आलेली असेल परंतु, सदर रक्कम पूलींग अकाऊंट मध्ये कालमर्यादेनंतर प्राप्त (Success Date) दिसुन येत असेल तर, अशा वेळेस संबंधीत खरेदीदारास उक्त विलंबामुळे भूर्दंड आकारण्यात येवू नये."**

**३.२ " EMD, $1/4^{th}$ , $3/4^{th}$ इत्यादीचा भरणा करण्याची कार्यवाही (Initiation) कालमर्यादेपूर्वीच सुरु करण्यात आली असेल. परंतु, सदर रक्कम पुलींग अकाऊंट मध्ये विहित कालमर्यादेनंतर देखील प्राप्त झाली नसेल (Unsuccessful Transaction) अशा वेळेस संबंधीत खरेदीदारास विलंबासाठी येणाऱ्या भुर्दंडाचा भरणा करणे क्रमप्राप्त ठरेल."**

**३.३ "ई-लिलावात यशस्वी H1 खरेदीदाराची इएमडीची रक्कम पुलींग खात्यामध्ये प्राप्त झाली असल्याबाबत प्रथम शहानिशा करुनच निकाल जाहिर करावे."**

४.० परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबी संदर्भात उचित कार्यवाही संबंधीत विभागीय व्यवस्थापक व एनआयसी यांच्या समन्वयाने पार पाडण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

**(संजीव गौड)**
**व्यवस्थापकीय संचालक (प्रभारी)**

प्रति,
महाव्यवस्थापक (सर्व)
प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व)
विभागीय व्यवस्थापक (सर्व)

प्रतिलीपी : श्री सुर्यकांत ढोके, वरिष्ठ तांत्रिक संचालक, एनआयसी यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.